# REPORT

**DEPARTMENT OF ECONOMICS, HISTORY, POLITICAL SCIENCE & PALI-PRAKRIT**
**SAVITRIBAI PHULE BIRTH ANNIVERSARY: 03-01-2019**
**GUEST LECTURE- DEVELOPMENT AND DISPLACEMENT**
**RESOURCE PERSON: DR. JOEL CABALLION, UNIVERSITY OF TOUR, FRANCE**

**DR. AMBEDKAR COLLEGE**

NAAC REACCREDITED WITH 'A' GRADE
COLLEGE WITH POTENTIAL FOR EXCELLENCE
DEEKSHABHOOMI, NAGPUR-440 010. (M.S.)
■ PH. : 9579755443 ■ E-MAIL : dacn_ngp@rediffmail.com
■ VISIT US AT : www.dacn.in

No. AC / __________ / _____

दिनांक: २१/१२/२०१८

**प्रसिध्दीसाठी**

डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र व पाली—प्राकृत विभागांच्या वतीने प्रा. डॉ. ज्वेल कॅबिलिऑन, सोरबोर्न युनिव्हर्सिटी, पॅरीस, फ्रांस, (Dr. Joel Cabalion, Sorbornne University, Paris, France) हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळींच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय पैलूंवर भाष्य करणार आहेत.

हा कार्यक्रम गुरूवार दि. ३ जानेवारी २०१९ ला सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयातील कॉन्फरन्स हॉल (रूम नं. १) येथे आयोजित केला आहे.

करिता सर्वांनी उपस्थित रहावे.

**डॉ आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथील अर्थशास्त्र, इतिहास, पाली-प्राकृत व राज्यशास्त्र विभागातर्फे दि. ०३/०१/२०१९ रोजी क्रांती ज्योती सावित्रीबाई बाई फुले जयंती कार्यक्रम व व्याख्यान आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ज्वेल (फ्रान्स) उपस्थित होते. डॉ ज्वेलनी गोसीखुर्द या धरणाचा अभ्यास करून विथापितांच्या समस्यांचे विश्लेषण केले आहे. याप्रसंगी 'भारतातील विकास,विस्थापन व पुनर्वसन ' या विषयावर बोलताना डॉ ज्वेल म्हणाले की, भारतातील विकास व विस्थापन प्रक्रिया अजूनही दुर्लक्षित**

आहे. त्यांनी या धरणामुळे विथापित झालेल्या  धरणग्रस्त गावांचा  प्रामुख्याने उल्लेख करून त्यांनी येथील विस्थापितांच्या समस्यांचा अभ्यास विध्यार्थ्या समोर मांडला.

विस्थापितांचे पुनर्वसन, जमीन संपादन, सार्वजनिक हित,  व न मिळालेले लाभ इत्यादीवर डॉ. ज्वेल यांनी विचार मांडले. मोठ्या धारणामुळे बहुसंख्य लोकांना विस्थापित व्हावे लागते. मात्र त्यांचे पुनर्वसन योग्य प्रकारे होत नसल्याने अनेक समस्या निर्माण होतात . आता पर्यन्त भारतातील विस्थापित  लोकांची संख्या पाहिली तर असे लक्ष्यात येते की ही संख्या फ्रांस या देशाच्या लोकसंखेपेक्षा किती तरी पटीने मोठी आहे . तेव्हा ही समस्या भारतात उग्र होत आहे त्यामुळे यावर योग्य उपाय केले नाही तर फार मोठ्या संकटाला  तोंड दयावे लागेल.

विचारपिठावर मा. विलास भोंगाडे ( सामाजिक कार्यकर्ता), डॉ. गौतम कांबळे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. अविनाश फुलझेले,इतिहास विभाग प्रमुख, डॉ. मोहन वानखडे, पाली प्राकृत विभाग प्रमुख, डॉ. शैलेश बहादुरे , डॉ. बापू शेंडे उपस्थित होते. याप्रसंगी बी.ए. प्रथम वर्षाच्या कु. मनिषा, कु. प्रिती या विद्यार्थीनिनी सावित्री बाईच्य शैक्षणिक कार्यावर विचार मांडले. सूत्र संचालन प्रा. विद्या चौरपगार यांनी केले. डॉ. अविनाश फुलझेले यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.







